# ''कमवा आणि शिका योजना, वंचितांच्या शिक्षणासाठी नवसंजीवनी : विशेष संदर्भ रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा.''

**डॉ. डी. व्ही. पवार**
उपप्राचार्य आणि विभाग प्रमुख,
ग्रामीण विकास कीर्ती महाविद्यालय, दादर मुंबई - ४०० ०२८.
**शुभम सोनावणे**
एम.ए. ग्रामीण विकास ,
महात्मा फुले कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , पनवेल

**प्रस्तावना :**

रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील एक अग्रेसर शिक्षण संस्था असून या संस्थेच्या महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत व कर्नाटक राज्यात मिळून ६७४ शाखा आहेत. त्यामध्ये २० पूर्व प्राथमिक, २७ प्राथमिक, ४३८ माध्यमिक, ८ आश्रमशाळा, ८ अध्यापक विद्यालये, २ आय. टी. आय. व ४१ महाविद्यालयांचा समावेश आहे. रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले, ता. कराड, जिल्हा, सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केली. काही काळानंतर कालेहून सातारा येथे १९२४ मध्ये संस्थेचे स्थलांतर करण्यात आले. ''स्वावलंबी शिक्षण, हेच आमचे ब्रीद'' हे संस्थेचे बोधवाक्य असून वटवृक्ष (वडाचे झाड) हे संस्थेचे बोधचिन्ह आहे. रयत म्हणजे शेतकरी, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी संस्था म्हणून 'रयत शिक्षण संस्था असे नामकरण करण्यात आले. जातीयता, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, सामाजिक व आर्थिक विषमता यांसारख्या सामाजिक समस्यांवर शिक्षण हाच प्रभावी उपाय आहे अशी कर्मवीर भाऊराव पाटील यांची धारणा होती.

ग्रामीण भागातील गरीबीमुळे वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर रहावे लागू नये व विद्यार्थ्यांची वाढ केवळ परिक्षार्थी, व पोटार्थी म्हणून न होता एक जबाबदार नागरिक म्हणून व्हावी या उद्देशाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' ही योजना राबविली. या योजनेमुळे गेल्या काही दशकांत अनेक गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले. प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती शिवाजी कॉलेजमधील कमवा आणि शिका योजनेचा, त्याच्या उपक्रमाचा, योजनेत समाविष्ट विद्यार्थी संस्थेचा अभ्यास करण्यात आला आहे व शेवटी प्राप्त झालेल्या निष्कर्षातून काही शिराफशी सुचविण्यात आल्या आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

(१) रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेबाबत आणि प्रसाराबाबत माहिती मिळविणे.

(२) छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीचा आणि 'कमवा आणि शिका' या उपक्रमाचा अभ्यास करणे.

(३) छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते शैक्षणिक वर्ष २०१५-१६ वर्षामधील विद्यार्थी संख्येचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके :**

(१) छत्रपती शिवाजी महाविद्यालयामुळे ग्रामीण भागातील मुलींच्या उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणाव वाढ झाली.

(२) छत्रपती शिवाजी महाविद्यालयामुळे ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली.

**संशोधन पद्धती :**

संशोधनाचा विषय हा ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाज महाविद्यालयाच्या अभ्यासाशी संबंधित असल्यामुळे सदर संशोधनाच्या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची स्थापना, छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील 'कमवा आणि शिका' योजना आणि महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या दरम्यानच्या विद्यार्थी संख्येचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच सदर संशोधन हे व्यष्टी अध्ययन स्वरुपाचे असल्याने संशोधनासाठी निरीक्षण आणि मुलाखत या पद्धतीचा वापर करण्यात आला.

**माहिती संकलन :** नियोजित संशोधनासाठी माहितीचे संकलन प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारे करण्यात आले :

**(अ) प्राथमिक साधने :** संशोधन विषयाची प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला.

**(१) प्रश्नावली :** सामाजिक शास्त्रातील सर्वेक्षणानुसार आधारित माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली पद्धतीचा वापर करण्यात आला. महाविद्यालयातील विविध विभागांची माहिती मिळवण्यासाठी संबंधित विभागाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून प्रश्नावलीच्या साहाय्याने विभाग, विभागाचे उपक्रम इ. संबंधी माहिती प्रत्यक्ष मुलाखत घेऊन संकलित करण्यात आली.

**(२) प्रत्यक्ष निरीक्षण :** छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा अभ्यास करण्यासाठी महाविद्यालयातील कार्यालय, 'कमवा आणि शिका विभाग' या विभागांना भेट देऊन त्यांच्या उपक्रमाचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले आहे आणि निरीक्षणाच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली.

**(ब) दुय्यम साधने :** छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा अभ्यास करण्यासाठी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल, कार्यालयीन दस्तऐवज व अन्य कागदपत्रातून महाविद्यालयासंबंधीची माहिती गोळा करण्यात आली. विषयाच्या सैद्धांतिक मांडणीसाठी शिक्षण, रयत शिक्षण संस्था, या विषयांवर प्रकाशित झालेली पुस्तके, लेख व अन्य प्रकाशित साहित्याचा अभ्यास करण्यात आला. इंटरनेटच्या माध्यमातून या विषयाच्या पूर्वसाहित्याचा आढावा घेण्यात आला

आहे.

**(क) माहितीचे विश्लेषण :** प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारा संकलित करण्यात आलेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर करुन वर्गीकरण व सारणीकरण करण्यात आले आणि संकलित माहितीचे प्रस्तुतीकरण आलेखाद्वारे करण्यात आले आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

सदर संशोधनामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ मधील पदवी व पद्व्युत्तर विभागाच्या विद्यार्थी संख्येचाच अभ्यास असल्याने संशोधनाची व्याप्ती व संशोधनाअंती निघालेले निष्कर्ष फक्त शिवाजी महाविद्यालयापुरतेच व संशोधनासाठी निवड करण्यात आलेल्या कालावधीपुरतेच सिमीत आहेत.

**कोष्टक क्र. १ : रयत शिक्षण संस्थेचा विभागीय विस्तार**

| विभाग | जिल्हे | शाखा संख्या |
|---|---|---|
| मध्य विभाग | सातारा, कोल्हापूर | २१६ |
| दक्षिण विभाग | सांगली, कोल्हापूर, बेळगाव, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | १२६ |
| उत्तर विभाग | अहमदनगर, नाशिक, बीड, नंदुरबार | १८२ |
| पश्चिम विभाग | पुणे | ९२ |
| रायगड विभाग | रायगड, बृहन्मुंबई, ठाणे | ५८ |
| एकूण शाखा | | ६७४ |

**छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा, अल्प परिचय :**

महाराष्ट्रातील सातारा या ऐतिहासिक शहरात कर्मयोगी भाऊराव पायगौंडा पाटील (अण्णा) यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षणाचे पहिले रोपटे छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या रूपाने १९४७ साली लावले आणि इतिहास निर्माण केला. सर्व बाजूंनी नडलेल्या रयतेला आणि दलितांना उच्च शिक्षणाची संधी देऊन आदर्श नागरिक बनवण्याचा व विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने महाविद्यालय वसतीगृह पद्धतीने चालविण्यचा प्रयत्न केला गेला.

आर्थिक दृष्टीने कमकुवत असलेल्या अनेक विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' या योजनेच्या माध्यमातून स्वत:चा सर्वांगीण विकास साधला. विद्यार्थी आणि समाज पुढे दैदीप्यमान आदर्श रहावा याकरिता या महाविद्यालयाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आले.

सन १९५८-५९ पासून महाविद्यालाय कला शाखेसोबतच शास्त्र आणि वाणिज्य शाखा सुरू करण्यात आली आहे. या तीन शाखांचा इतका विस्तार झाला की १९६५ सालापासून शास्त्र शाखा वेगळी करून स्वतंत्र महाविद्यालयात रूपांतर करण्यात आले आणि १९७१ साली वाणिज्य शाखेचे स्वतंत्र महाविद्यालय स्थापन करण्यात आले.

सन १९७१ पासून छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा विकास व विस्तार केवळ कला शाखेचे महाविद्यालय म्हणून

होत आहे.

सध्या या महाविद्यालयात ११वी व १२ वी असे दोन वर्ग जोडण्यात आले आहेत. या महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागातील बी. ए. भाग १ ते एम. फील पर्यंतची होणारी विद्यार्थी संख्या ५००० पेक्षा जास्त आहे.

सदर संशोधनासाठी महाविद्यालयातील केवळ वरिष्ठ विभागातील बी. ए. भाग १ ते एम. ए. भाग २ मधील शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मधीलच विद्यार्थ्यांच्या संख्येचा अभ्यास करण्यात आला आहे.


**माहितीचे विश्लेषण व प्रस्तुतीकरण**

**कोष्टक क्र. १ : छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील लिंग निहाय विद्यार्थी संख्या**

| वर्ष | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकूण |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १३६८ | १३३७ | २७०५ |
| २०१२-१३ | १४२२ | १३४३ | २७६५ |
| २०१३-१४ | १५२४ | १३९१ | २९१५ |
| २०१४-१५ | १४७१ | १३३० | २८०१ |
| २०१५-१६ | १५४५ | १२८६ | २८३१ |

**विद्यार्थ्यांच्या पटसंख्येचे आलेखीय विवरण :**

**लिंगनिहाय विद्यार्थ्यांची पटसंख्या (शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६)**




**कोष्टक क्र. ३ : जातीनिहाय विद्यार्थ्यांची संख्या**

| प्रवर्ग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | ४३४ | ४२४ | ४६१ | ४७९ | ५२० |
| अनुसूचित जमाती | ०८ | १० | १६ | १३ | १४ |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विमुक्त जमाती (अ) | ६८ | ७८ | ८३ | ९६ | १२४ |
| भटक्या जमाती (ब) | ८७ | ९३ | ९१ | ८४ | ७८ |
| भटक्या जमाती (क) | १०९ | ११६ | १४१ | १५८ | १७७ |
| भटक्या जमाती (ड) | ८ | १२ | १९ | १८ | १४ |
| इतर मागासवर्गीय | ४०९ | ४४६ | ३९० | ३९३ | ४२० |
| बिगर मागासवर्गीय | १५८२ | १५८६ | १७१४ | १५६० | १४८४ |
| **एकूण** | **२७०५** | **२७६५** | **२९१५** | **२८०१** | **२८३१** |

**कोष्टक क्र. ४ : जातीनिहाय विद्यार्थ्यांची टक्केवारी**

| प्रवर्ग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १६.०४% | १५.३३% | १५.८१% | १७.१०% | १८.३६% |
| अनुसूचित जमाती | ०.२९% | ०.३६% | ०.५४% | ०.४६% | ०.४९% |
| विमुक्त जमाती (अ) | २.५१% | २.८२% | २.८४% | ३.४२% | ४.३८% |
| भटक्या जमाती (ब) | ३.२१% | ३.३६% | ३.१२% | २.९९% | २.७५% |
| भटक्या जमाती (क) | ४.०२% | ४.१९% | ४.८३% | ५.६४% | ६.२५% |
| भटक्या जमाती (ड) | ०.२९% | ०.४३% | ०.६५% | ०.६४% | ०.४९% |
| इतर मागासवर्गीय | १५.१२% | १६.१३% | १३.३७% | १४.०३% | १४.८३% |
| बिगर मागासवर्गीय | ५८.४८% | ५७.३५% | ५८.७९% | ५५.६९% | ५२.४१% |

**पटसंख्येचे आलेखीय विवरण :**


**विद्यार्थ्यांच्या पटसंख्येचे जातीनिहाय आलेखीय विवरण :**



**कोष्टक क्र. ५ : मागासवर्गीय विद्यार्थी व बिगर मागासवर्गीय विद्यार्थी तुलना**

| प्रवर्ग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण मागासवर्गीय विद्यार्थी | ११२३ (४१.५१%) | ११७९ (४२.६४%) | १२०१ (४१.२०%) | १२४१ (४४.३०%) | १४३८ (४७.५८% |
| एकूण बिगर मागासवर्गीय विद्यार्थी | १५८२ (५८.४८%) | १५८४ (५७.३५%) | १७१४ (५८.७९%) | १५६० (५५.६९%) | १३९३ (५२.४१%) |

**मागासवर्गीय विद्यार्थी व बिगर मागासवर्गीय विद्यार्थी तुलना :**




**कमवा आणि शिका योजनेची उद्दिष्ट्ये : (OBJECTIVES OF EARN AND LEARN SCHEME) :**

१. बहुजन समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक परिस्थिती नाही अशा विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध करून देणे.

२. कमवा आणि शिका योजनेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधणे.

**कमवा आणि शिका योजनेचे उपक्रम :**

● कृषी विभाग ● कार्यालयीन कामकाज विभाग ● पिठाची गिरणी ● दुग्धोत्पादन व पशुपालन विभाग ● उपहारगृह ● मुलांचे वसतीगृह (मेस)

**कमवा आणि शिका योजनेमधील विद्यार्थ्यांच्या संख्येचे जातीनिहाय विवरण :**


**कोष्टक क्र. ६ : कमवा आणि शिका योजनेमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांची संख्या**

| प्रवर्ग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| मागासवर्गीय विद्यार्थी | ७६ (५०.३३%) | ७६ (५४.६७%) | १२३ (६०.२९%) | ७४ (५७.९८%) | ८० (६५.०४%) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बिगर मागासवर्गीय विद्यार्थी | ७५ (४९.६६%) | ६३ (४५.३२%) | ८१ (३९.७०%) | ४५ (४२.०१%) | ४३ (३४.९५%) |
| एकूण | १५१ | १३९ | २०४ | ११९ | १२३ |

**कमवा आणि शिका योजनेतील विद्यार्थीसंख्येचे जातीनिहाय आलेखीय विवरण**

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ मधील कमवा आणि शिका योजनेतील विद्यार्थी संख्या**




**निष्कर्ष :**

(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ ते शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत ६.०७% इतकी वाढ झाली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येत संख्यात्मक वाढ होण्याचे प्रमुख कारण हे महाविद्यालयात कार्यरत असणारी ‘कमवा आणि शिका’ ही योजना आहे.

(२) इतर अभ्यास शाखेच्या तुलनेत कला शाखेकरता लागणारा खर्च तुलनात्मक दृष्टीने कमी असल्या कारणाने मागासवर्गीय विद्यार्थी कला शाखेकडे वळताना दिसतात.

(३) ‘कमवा आणि शिका’ योजनेमध्ये खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांपेक्षा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपेक्षा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.

(४) ‘कमवा आणि शिका’ योजनेमध्ये विद्यार्थीनींचे प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या विद्यार्थ्यांपेक्षा अल्प आहे.

(५) ‘कमवा आणि शिका’ या योजनेतील उपक्रमातून प्राप्त होणारे उत्पन्न आणि योजनेतील विद्यार्थ्यांवर होत असलेला वार्षिक खर्चाचा विचार करता ही योजना आर्थिक दृष्ट्या तोट्यात आहे.

(६) ‘कमवा आणि शिका’ योजनेमुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित होत आहेत.

(७) स्वावलंबन, प्रामाणिकपणा, आत्मनिर्भयता, चिकाटी यांसारखी मूल्ये या योजनेच्या माध्यमातून जन्म घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची वाढ केवळ परीक्षार्थी म्हणून न होता एक जबाबदार नागरिक म्हणून होत आहे.

(८) राष्ट्रउभारणीत ‘कमवा आणि शिका’ योजना महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडताना दिसून येते.

**शिफारशी**

(१) महाराष्ट्रातील नामांकित शिक्षणसंस्थांनी स्वत:च्या पुढाकाराने आणि स्वयंप्रेरणेने ‘कमवा आणि शिका’ ही योजना

आपल्या संस्थांमध्ये राबवावी.

(२) ‘कमवा आणि शिका’ योजनेतील उपक्रमातून प्राप्त होणारे उत्पन्न आणि योजनेत समाविष्ट विद्यार्थ्यांवर महाविद्यालयाला करावा लागणारा खर्च याचा विचार करता छत्रपती शिवाजी महाविद्यालयाला मोठ्या प्रमाणात आर्थिक तुट सहन करावी लागत आहे. त्यामुळे ही तुट महाविद्यालयाला सहन करायला लागू नये म्हणून शासनामार्फत ही योजना राबवित असताना संबंधित महाविद्यालयाला योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आर्थिक मदत अनुदानाच्या स्वरूपात देण्यात यावी.

(३) महाराष्ट्रातील अनेक नामांकित विद्यापिठांमध्ये ‘कमवा आणि शिका’ ही योजना विद्यापीठ पातळीवर राबविली जात आहे. राष्ट्र उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावू शकणाऱ्या योजनेची अंमलबजावणी फक्त विद्यापिठ पातळीवरच न करता विद्यापिठांनी आपल्या संलग्न महाविद्यालयांमध्ये ही योजना राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना या धर्तीवर राबवावी.

**संदर्भ सूची :**

(१) तांबोळी, शमसुद्दीन (२००९), ‘महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास नवे दालन - नव्या संधी’ डायमंड प्रकाशन, पुणे

(२) नाईकवाडे, अशोक. ‘ग्रामीण रयतेचे ज्ञानपीठ आधारवड कर्मवीर भाऊराव पाटील गौरवग्रंथ’, विद्याभारती प्रकाशन, पुणे

(३) छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा सातारा विशेष अंक शिवगौरव सुवर्णमहोत्सवी वर्ष - १९९६-१९९७

(४) कर्मवीर भाऊराव पाटील - एक महान कर्मयोगी, रयत कर्मवीर विद्याप्रबोधिनी, २०१५

(५) छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची माहितीपत्रके